21 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज अँड व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# विद्यापीठाची 'पेटंट गॅलरी' ठरली लक्षवेधक



**कोल्हापूर, ( महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठात आजपासून सुरू झालेल्या दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषदेमध्ये विशेष औद्योगिक प्रदर्शन आणि पोस्टर प्रदर्शन व स्पर्धेचे उद्घाटन दुपारी करण्यात आले. यामध्ये शिवाजी विद्यापीठाने गेल्या पाच वर्षांत प्राप्त केलेल्या बौद्धिक संपदा हक्क अर्थात पेटंटची गॅलरी सर्वाधिक लक्षवेधक ठरली.

विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात या प्रदर्शन-स्पर्धेचे दुपारी फीत कापून उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनानंतर डॉ. जाधव यांनी फिरून सर्व प्रदर्शनाची पाहणी केली. त्याचप्रमाणे सहभागी उद्योजक-व्यावसायिकांनी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या उपक्रमामध्ये सहभागी करून घेण्याविषयी तसेच आवश्यक तेथे मार्गदर्शन व सहकार्य करण्याविषयी सूचित केले.


या आंतरराष्ट्रीय परिषदेत गतवर्षीप्रमाणे यंदाही अनेक स्थानिक उद्योजक, व्यावसायिक सहभागी झाले आहेत. यामध्ये अभिनव स्टार्टअपपासून ते प्रयोगशील उत्पादक, व्यावसायिक यांचा सहभाग राहिला. असे एकूण २० स्टॉल आहेत. सेंद्रिय, पर्यावरणपूरक पदार्थ, वस्तू आणि उत्पादने येथे प्रदर्शन, नोंदणी व विक्रीसाठी उपलब्ध आहेत. यामध्ये डॉ. गजानन राशिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठाच्या बौद्धिक संपदा हक्क (आयपीआर) कक्षाच्या वतीने गेल्या पाच वर्षांत विद्यापीठाने प्राप्त केलेल्या विविध पेटंट प्रमाणपत्रांची गॅलरीही मांडण्यात आली आहे. ही प्रमाणपत्रे पाहण्यासाठी जिज्ञासू संशोधक विद्यार्थ्यांची मोठी गर्दी झाली. ही गॅलरी अभिनव आणि दर्जेदार संशोधनासाठी प्रेरणा देणारी ठरेल, असा विश्वास डॉ. राशिनकर यांनी व्यक्त केला. याखेरीज वीज बचत उपकरणे, औद्योगिक उपकरणे, सौर उपकरणे, आधुनिक लॉकर्स, कॉफी विथ सी.ए., स्टार्च थ्री-डी प्रिंटींग, सेंद्रिय खाद्यपदार्थ इत्यादींचेही स्टॉल आहेत.

पोस्टर प्रदर्शनात इंजिनिअरिंग व फेंच टेक, आय.टी. व इमर्जिंग टेक्नॉलॉजी, सोशिओ-मॅनेजमेंट व फिट-टेक, सस्टेनेबिलिटी व हेल्थ या चार गटांमध्ये सुमारे शंभर पोस्टर संशोधक विद्यार्थ्यांनी प्रदर्शित केले.

दरम्यान, परिषदेत आज दिवसभरात देशविदेशांतील तज्ज्ञांनी विविध महत्त्वाच्या विषयांवर मांडणी केली. यामध्ये मलेशियाच्या टेक्नॉलॉजी विद्यापीठाचे डॉ. मोहम्मद याझीद बिन याह्या, डॉ. अहमद इलियास बिन रुस्दान, ऑस्ट्रेलियाच्या साऊथवेल्स विद्यापीठाचे डॉ. महेश सूर्यवंशी, चितळे जिनस एबीएस इंडियाचे गिरीश चितळे, डी.वाय. पाटील वैद्यकीय विद्यापीठाचे डॉ. देवव्रत हर्षे, 'सिरी'चे सहसंस्थापक सचिन कुंभोज, ग्लोबल फायनान्सचे संस्थापक संचालक योगेश कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

2 1 JAN 2026

तरुण भारत



कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना संपादक अरूण खोरे. सोबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. रणधीर शिंदे, विष्णू पावले.

# 'प्रतिसरकार चळवळीचे दस्तऐवजीकरण गरजेचे'

प्रतिनिधी
कोल्हापूर

सातारची प्रतिसरकार चळवळ ही आदर्श राजनीतीचे प्रतीक होते. संघटनात्मक कार्याचे प्रारूप म्हणून याकडे नव्या अभ्यासकांनी पाहायला हवे. किंबहुना प्रतिसरकार चळवळीचे दस्तऐवजीकारण होणे गरजेचे असून लोकशाहीच्या व्यापक विस्तारात जी. डी. बापूंचे स्मरण ठेवणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ संपादक अरुण खोरे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील 'क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड अध्यासन' आयोजित 'प्रतिसरकारची चळवळ आणि जी. डी. बापू लाड या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

अरूण खोरे म्हणाले, भूमिगत चळवळ ही सामान्य माणसांचा आवाज होती. लोकशाहीचा विचार केंद्रस्थानी ठेवून ती राबवली जात होती. आता मात्र आजच्या स्थितीगतीने या कार्याचा विचार व्हायला हवा. त्यासाठी सामाजिक दुवे मांडणे गरजेचे आहे. या चळवळीमागे तत्कालीन महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास आणि संसदीय लोकशाहीचा संदर्भ आहे.

मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. विष्णू पावले यांनी आभार मानले. सूत्रसंचालन भक्ती नाईक यांनी केले.

21 JAN 2026
लोकमत



शिवाजी विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय परिषदेत मंगळवारी औद्योगिक प्रदर्शन व पोस्टर स्पर्धेचे उद्घाटन डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. सागर डेळेकर, डॉ. सुभाष माने, डॉ. गजानन राशिनकर, आदी उपस्थित होते.

# शिक्षण-उद्योग-शासन परिषदेस विद्यापीठात प्रारंभ

## पेटंटची गॅलरी ठरली सर्वाधिक लक्षवेधक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मंगळवारपासून दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषदेस प्रारंभ झाला. या परिषदेतील विशेष औद्योगिक प्रदर्शन, पोस्टर प्रदर्शन व स्पर्धेचे उद्घाटन मंगळवारी झाले. यात शिवाजी विद्यापीठाने गेल्या पाच वर्षात प्राप्त केलेल्या बौद्धिक संपदा हक्क अर्थात पेटंटची गॅलरी सर्वाधिक लक्षवेधक ठरली.

विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात प्रदर्शन-स्पर्धेचे फीत कापून उद्घाटन झाले. या परिषदेत अभिनव स्टार्टअपपासून प्रयोगशील उत्पादक, व्यावसायिक सहभागी झाले आहेत. त्यांचे २० स्टॉल आहेत. सेंद्रिय, पर्यावरणपूरक पदार्थ, वस्तू व उत्पादने येथे प्रदर्शन, नोंदणी व विक्रीसाठी उपलब्ध आहेत. यात डॉ. गजानन राशिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली वाजी

## परिषदेत तज्ज्ञांची मांडणी

दरम्यान, परिषदेत देश-विदेशांतील तज्ज्ञांनी विविध विषयांवर मांडणी केली. यात मलेशियाच्या टेक्नॉलॉजी विद्यापीठाचे डॉ. मोहम्मद याझीद बिन याह्या, डॉ. अहमद इलियास बिन रुश्दान, ऑस्ट्रेलियाच्या साऊथवेल्स विद्यापीठाचे डॉ. महेश सूर्यवंशी, चितळे जिनस एबीएस इंडियाचे गिरीश चितळे, डी. वाय. पाटील वैद्यकीयचे डॉ. देवव्रत हर्षे, 'सिरी'चे सहसंस्थापक सचिन कुंभोज, ग्लोबल फायनान्सचे संस्थापक संचालक योगेश कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

विद्यापीठाच्या बौद्धिक संपदा हक्क कक्षातर्फे विद्यापीठाने प्राप्त केलेल्या पेटंट प्रमाणपत्रांची गॅलरीही मांडली आहे.

वीज बचत उपकरणे, औद्योगिक उपकरणे, सौर उपकरणे, कॉफी विथ सी.ए., स्टार्च थ्री-डी प्रिंटिंग, सेंद्रिय खाद्यपदार्थांचेही स्टॉल आहेत. पोस्टर प्रदर्शनात इंजिनिअरिंग व फॅब टेक, आय.टी. व इमर्जिंग - टेक्नॉलॉजी, सोशिओ-मॅनेजमेंट व फिट-टेक, सस्टेनेबिलिटी व हेल्थ या गटांमध्ये शंभर पोस्टर संशोधकांनी प्रदर्शित केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JAN 2026

सकाळ

# विद्यापीठाची 'पेटंट गॅलरी' ठरली लक्षवेधक

## संशोधक विद्यार्थ्यांची गर्दी; पर्यावरणपूरक उत्पादनांचे स्टॉल

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठात सुरू झालेल्या दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषदेमध्ये विशेष औद्योगिक प्रदर्शन आणि पोस्टर प्रदर्शन व स्पर्धेचे उद्घाटन झाले. त्यामध्ये विद्यापीठाने गेल्या पाच वर्षांत प्राप्त केलेल्या बौद्धिक संपदा हक्क अर्थात पेटंटची गॅलरी सर्वाधिक लक्षवेधक ठरली.

विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात या प्रदर्शन-स्पर्धेचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनानंतर डॉ. जाधव यांनी फिरून सर्व प्रदर्शनाची पाहणी केली. त्याचप्रमाणे सहभागी उद्योजक-व्यावसायिकांनी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या उपक्रमामध्ये सहभागी करून घेण्याविषयी तसेच आवश्यक तेथे मार्गदर्शन व सहकार्य करण्याविषयी सूचित केले.

या आंतरराष्ट्रीय परिषदेत गतवर्षीप्रमाणे यंदाही अनेक स्थानिक उद्योजक, व्यावसायिक सहभागी झाले आहेत. यामध्ये अभिनव स्टार्टअपपासून ते प्रयोगशील उत्पादक, व्यावसायिक यांचा सहभाग राहिला. असे एकूण २० स्टॉल आहेत. सेंद्रिय, पर्यावरणपूरक पदार्थ, वस्तू आणि उत्पादने येथे प्रदर्शन, नोंदणी, विक्रीसाठी उपलब्ध आहेत. यामध्ये डॉ. गजानन राशिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या बौद्धिक संपदा हक्क कक्षाने गेल्या पाच वर्षांत विद्यापीठाने प्राप्त केलेल्या विविध पेटंट प्रमाणपत्रांची गॅलरी मांडली आहे. ही प्रमाणपत्रे पाहण्यासाठी जिज्ञासू संशोधक विद्यार्थ्यांची गर्दी झाली.

पोस्टर प्रदर्शनात इंजिनिअरिंग व फॅब टेक, आय.टी., इमर्जिंग टेक्नॉलॉजी, सोशिओ-मॅनेजमेंट व फिट-टेक, सस्टेनेबिलिटी व हेल्थ या चार गटांमध्ये सुमारे शंभर पोस्टर संशोधक विद्यार्थ्यांनी प्रदर्शित केले.



शिवाजी विद्यापीठ : औद्योगिक प्रदर्शनात सहभागी उद्योजकांच्या उत्पादनांची पाहणी करताना प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. यावेळी शेजारी डॉ. सागर डेळेकर, सुभाष माने.

### तज्ज्ञांनी मांडले महत्त्वाचे विषय

या परिषदेत दिवसभरात देशविदेशांतील तज्ज्ञांनी उद्योग-व्यवसाय, स्टार्टअप, आदींबाबतच्या विविध महत्त्वाच्या विषयांवर मांडणी केली. यामध्ये मलेशियाच्या टेक्नॉलॉजी विद्यापीठाचे डॉ. मोहम्मद याझीद बिन याह्या, डॉ. अहमद इलियास बिन रुश्दान, ऑस्ट्रेलियाच्या साऊथवेल्स विद्यापीठाचे डॉ. महेश सूर्यवंशी, चितळे जिनस एबीएस इंडियाचे गिरीश चितळे, डी.वाय. पाटील वैद्यकीय विद्यापीठाचे डॉ. देवव्रत हर्षे, 'सिरी'चे सहसंस्थापक सचिन कुंभोज, ग्लोबल फायनान्सचे संस्थापक संचालक योगेश कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

21 JAN 2026
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाची 'पेटंट गॅलरी' लक्षवेधी

## आंतरराष्ट्रीय शिक्षण, उद्योग, शासन परिषदेला प्रारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय शिक्षण, उद्योग, शासन परिषदेमध्ये विशेष औद्योगिक प्रदर्शन आणि पोस्टर प्रदर्शन व स्पर्धेला सुरूवात झाली. विद्यापीठाच्या प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते परिषेदेचे उद्घाटन झाले. यामध्ये शिवाजी विद्यापीठाने गेल्या पाच वर्षांत प्राप्त केलेल्या बौद्धिक संपदा हक्क अर्थात पेटंटची गॅलरी सर्वाधिक लक्षवेधक ठरली.

राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात या प्रदर्शन सुरूवात करण्यात आली. डॉ. जाधव यांनी प्रदर्शनाची पाहणी केली. सहभागी उद्योजक–व्यावसायिकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या उपक्रमामध्ये सहभागी करून घेण्याविषयी तसेच आवश्यक तेथे मार्गदर्शन व सहकार्य करण्याविषयी सूचना दिल्या.

या परिषदेत अनेक स्थानिक उद्योजक, व्यावसायिक सहभागी झाले आहेत. यामध्ये अभिनव स्टार्टअपपासून ते प्रयोगशील उत्पादक, व्यावसायिक यांचा सहभाग आहे. एकूण २० स्टॉल आहेत. सेंद्रिय, पर्यावरणपूरक पदार्थ, वस्तू आणि उत्पादने येथे प्रदर्शन, नोंदणी व विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

परिषदेत डॉ. गजानन राशिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठाच्या बौद्धिक संपदा हक्क कक्षाच्या वतीने गेल्या पाच वर्षांत विद्यापीठाने प्राप्त केलेल्या विविध पेटंट प्रमाणपत्रांची गॅलरीही मांडण्यात आली आहे. वीज बचत उपकरणे, औद्योगिक उपकरणे, सौर उपकरणे, आधुनिक लॉकर्स, कॉफी विथ सी.ए., स्टार्च थ्री–डी प्रिंटिंग, सेंद्रिय खाद्यपदार्थांचेही स्टॉल आहेत.

परिषदेत मलेशियाच्या टेक्नॉलॉजी विद्यापीठाचे डॉ. मोहम्मद याझीद बिन याह्या, डॉ. अहमद इलियास बिन रुश्दान, ऑस्ट्रेलियाच्या साऊथवेल्स विद्यापीठाचे डॉ. महेश सूर्यवंशी, चितळे जिनस एबीएस इंडियाचे गिरीश चितळे, डी. वाय. पाटील वैद्यकीय विद्यापीठाचे डॉ. देवव्रत हर्षे यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 1 JAN 2026

पुण्यनगरी

# विद्यापीठाची 'पेटंट गॅलरी' ठरली लक्षवेधी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात मंगळवारपासून सुरू झालेल्या दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषदेमध्ये विशेष औद्योगिक आणि पोस्टर प्रदर्शन व स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये शिवाजी विद्यापीठाने गेल्या पाच वर्षांत प्राप्त केलेल्या बौद्धिक संपदा हक्क अर्थात पेटंटची गॅलरी सर्वाधिक लक्षवेधी ठरली.

विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात या प्रदर्शन व स्पर्धेचे दुपारी फीत कापून उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनानंतर डॉ. जाधव यांनी फिरून सर्व प्रदर्शनाची पाहणी केली. त्याचप्रमाणे सहभागी उद्योजक-व्यावसायिकांनी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना त्यांच्या उपक्रमामध्ये सहभागी करून घेण्याविषयी, तसेच आवश्यक तेथे मार्गदर्शन व सहकार्य करण्याविषयी सूचित केले.




शिवाजी विद्यापीठात आयोजित औद्योगिक प्रदर्शनात सहभागी उद्योजकांच्या उत्पादनांची पाहणी करताना प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. सोबत डॉ. सागर डेळेकर आणि डॉ. सुभाष माने.

या आंतरराष्ट्रीय परिषदेत गतवर्षीप्रमाणे यंदाही अनेक स्थानिक उद्योजक, व्यावसायिक सहभागी झाले आहेत. यामध्ये अभिनव स्टार्टअपपासून ते प्रयोगशील उत्पादक, व्यावसायिक यांचा सहभाग होता. यात एकूण २० स्टॉल आहेत. सेंद्रिय, पर्यावरणपूरक पदार्थ, वस्तू आणि उत्पादने येथे प्रदर्शन, नोंदणी व विक्रीसाठी उपलब्ध आहेत. यामध्ये डॉ. गजानन राशिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठाच्या बौद्धिक संपदा हक्क (आयपीआर) कक्षाच्या वतीने गेल्या पाच वर्षांत विद्यापीठाने प्राप्त केलेल्या विविध पेटंट प्रमाणपत्रांची गॅलरीही मांडण्यात आली आहे. ही प्रमाणपत्रे पाहण्यासाठी जिज्ञासू संशोधक विद्यार्थ्यांची मोठी गर्दी झाली. ही गॅलरी अभिनव आणि दर्जेदार संशोधनासाठी प्रेरणा देणारी ठरेल, असा विश्वास डॉ. राशिनकर यांनी व्यक्त केला. याखेरीज वीज बचत उपकरणे, औद्योगिक उपकरणे, सौर उपकरणे, आधुनिक लॉकर्स, कॉफी विथ सी. ए., स्टार्च थ्री-डी प्रिंटिंग, सेंद्रिय खाद्यपदार्थ इत्यादींचेही स्टॉल उभारले आहेत.

पोस्टर प्रदर्शनात इंजिनिअरिंग व फॅब टेक, आय. टी. व इमर्जिंग टेक्नॉलॉजी, सोशिओ-मॅनेजमेंट व फिंट-टेक, सस्टेनेबिलिटी व हेल्थ या चार गटांमध्ये सुमारे शंभर पोस्टर संशोधक विद्यार्थ्यांनी प्रदर्शित केले.

दरम्यान, परिषदेत दिवसभरात देश-विदेशांतील तज्ज्ञांनी विविध महत्त्वाच्या विषयांवर संवाद साधला. यामध्ये मलेशियाच्या टेक्नॉलॉजी विद्यापीठाचे डॉ. मोहम्मद याझीद बिन याह्या, डॉ. अहमद इलियास बिन रुश्दान, ऑस्ट्रेलियाच्या साऊथवेल्स विद्यापीठाचे डॉ. महेश सूर्यवंशी, चितळे जिनस एबीएस इंडियाचे गिरीश चितळे, डी. वाय. पाटील वैद्यकीय विद्यापीठाचे डॉ. देवव्रत हर्षे, 'सिरी'चे सहसंस्थापक सचिन कुंभोज, ग्लोबल फायनान्सचे संस्थापक संचालक योगेश कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JAN 2026

पुढारी

# स्थानिक पातळीवर स्टार्टअप संस्कृतीचा विकास महत्त्वाचा

## अश्विनी दाणीगोंड; शिवाजी विद्यापीठात दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेस प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जागतिक स्तरावर झेप घेण्यासाठी स्थानिक पातळीवर स्टार्टअप संस्कृतीचा विकास होणे ही महत्त्वाची बाब आहे, असे प्रतिपादन उद्योजक अश्विनी दाणीगोंड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आजपासून दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषदेस प्रारंभ झाला. उद्घाटन समारंभाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या. अमेरिकेतील रोवान विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. रामानुजाचार्य आणि नवी दिल्ली येथील डी. आर. डी. ओ. च्या महासंचालक डॉ. चंद्रिका कौशिक प्रमुख उपस्थित होते. शिक्षण, उद्योग आणि शासन हा विद्या, बुद्धी आणि शक्ती यांची त्रिवेणी संगम असून, त्या माध्यमातूनच देशात उद्योग-व्यवसायांचे सक्षमीकरण करणे शक्य आहे. यावेळी प्रा. रामानुजाचार्य म्हणाले, शैक्षणिक क्षेत्राला उद्योगांच्या गरजांनुसार संशोधनाच्या दिशा ठरवाव्या लागतात. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील नवनव्या प्रवाहांवर शैक्षणिक क्षेत्राचे बारीक लक्ष असणे महत्त्वाचे आहे. याप्रसंगी डॉ. चंद्रिका कौशिक यांनी मनोगत व्यक्त केले. अश्विनी दाणीगोंड यांच्या हस्ते परिषदेच्या ई-स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. परिषदेचे समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी प्रास्ताविक केले. सहसमन्वयक डॉ. सुभाष माने यांनी आभार मानले.




**कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात बोलताना अश्विनी दाणीगोंड. समवेत डॉ. सागर डेळेकर, प्रा. रामानुजाचार्य, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. चंद्रिका कौशिक, डॉ. सुभाष माने. (छाया : मिलन मकानदार)**

यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव यांच्यासह ज्येष्ठ संशोधक डॉ. प्रकाश वडगावकर, मलेशियाचे डॉ. मोहम्मद याझीद, ऑस्ट्रेलियाचे डॉ. महेश सूर्यवंशी, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. संजय चव्हाण, डॉ. कल्याणराव गरडकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JAN 2026

पुण्यनगरी

# स्थानिक पातळीवर स्टार्टअप संस्कृतीचा विकास महत्त्वाचा

## अश्विनी दानीगोंड : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषदेस प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जागतिक स्तरावर झेप घेण्यासाठी स्थानिक पातळीवर स्टार्टअप संस्कृतीचा विकास होणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे, असे प्रतिपादन प्रख्यात उद्योजक अश्विनी दानीगोंड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात मंगळवारपासून दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषदेस प्रारंभ झाला. परिषदेच्या उद्घाटन समारंभाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या, तर अमेरिकेतील रोवान विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. कंडलम रामानुजाचार्य, नवी दिल्ली येथील डीआरडीओच्या महासंचालक डॉ. चंद्रिका कौशिक प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.



आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात बोलताना अश्विनी दानीगोंड.

अश्विनी दानीगोंड म्हणाल्या, उद्योजकता विकासाच्या प्रक्रियेमध्ये आजघडीला नवोन्मेषाला पर्याय नाही. त्यासाठी केवळ मूल्यांकनावर नव्हे, तर मूल्यनिर्मितीवर भर देण्याची आवश्यकता आहे. शिक्षण, उद्योग आणि शासन हा विद्या, बुद्धी आणि शक्ती यांचा त्रिवेणी संगम असून, त्या माध्यमातूनच देशामध्ये उद्योग-व्यवसायांचे सक्षमीकरण करणे शक्य आहे. 'विकसित भारत २०४७' ही संकल्पना आपल्याला प्रत्यक्षात आणायची असल्यास त्या प्रक्रियेमध्ये शैक्षणिक क्षेत्रात योगदान अत्युच्च असण्याची आवश्यकता आहे. उच्च गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन गुणवत्तासंपन्न विद्यार्थी देशाला सोपवण्याची जबाबदारी उच्च शिक्षण संस्थांवर आहे.

यावेळी प्रा. रामानुजाचार्य म्हणाले, शैक्षणिक क्षेत्राला उद्योगांच्या गरजांनुसार आपल्या संशोधनाच्या दिशा ठरवाव्या लागतात. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील नवनव्या प्रवाहांवर शैक्षणिक क्षेत्राचे बारीक लक्ष असणे महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने शिक्षण-उद्योग सहकार्य परिषदा कळीची भूमिका बजावतात.

यावेळी डॉ. चंद्रिका कौशिक यांनीही मनोगत व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी वाहून परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. अश्विनी दानीगोंड यांच्या हस्ते परिषदेच्या ई-स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी झालेल्या चर्चेतून स्थानिक पातळीवर स्टार्टअप संस्कृतीचा विकास किती महत्त्वाचा आहे, हे अधोरेखित झाले.

परिषदेचे समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी प्रास्ताविक केले. सहसमन्वयक डॉ. सुभाष माने यांनी आभार मानले.

यावेळी अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, ज्येष्ठ संशोधक डॉ. प्रकाश वडगावकर, मलेशियाचे डॉ. मोहम्मद याझीद, ऑस्ट्रेलियाचे डॉ. महेश सूर्यवंशी, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. संजय चव्हाण, डॉ. कल्याणराव गरडकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ
21 JAN 2026

# विद्या, शक्तीच्या संगमातून उद्योग सक्षमीकरण शक्य

## अश्विनी दानीगोंड : शिवाजी विद्यापीठात शिक्षण-उद्योग-शासन परिषदेला प्रारंभ

कोल्हापूर, ता. २० : 'जागतिक स्तरावर झेप घेण्यासाठी स्थानिक पातळीवर स्टार्टअप संस्कृतीचा विकास होणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. शिक्षण, उद्योग आणि शासन हा विद्या, बुद्धी आणि शक्ती यांचा त्रिवेणी संगम असून, त्या माध्यमातूनच देशात उद्योग-व्यवसायांचे सक्षमीकरण करणे शक्य असल्याचे प्रतिपादन उद्योजक अश्विनी दानीगोंड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषदेच्या उद्घाटन समारंभाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, तर अमेरिकेतील रोवान विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. कंडलम् रामानुजाचार्य, नवी दिल्ली येथील डी.आर.डी.ओ.च्या महासंचालक डॉ. चंद्रिका कौशिक प्रमुख उपस्थित होते.




**कोल्हापूर** : येथील परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना उद्योजक अश्विनी दानिगोंड. यावेळी डावीकडून डॉ. सागर डेळेकर, प्रा. कंडलम् रामानुजाचार्य, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. चंद्रिका कौशिक, सुभाष माने उपस्थित होते.

दानिगोंड म्हणाल्या, 'उद्योजकता विकासाच्या प्रक्रियेमध्ये आजघडीला नवोन्मेषाला पर्याय नाही. त्यासाठी केवळ मूल्यांकनावर नव्हे, तर मूल्यनिर्मितीवर भर देण्याची आवश्यकता आहे.' यावेळी डॉ. चंद्रिका कौशिक यांनी मनोगत व्यक्त केले. परिषदेचे समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत केले.

### औद्योगिक प्रवाहांवर शैक्षणिक क्षेत्राचे लक्ष हवे

प्रा. रामानुजाचार्य म्हणाले, 'शैक्षणिक क्षेत्राला उद्योगांच्या गरजांनुसार आपल्या संशोधनाच्या दिशा ठरवाव्या लागतात. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील नवनव्या प्रवाहांवर शैक्षणिक क्षेत्राचे बारीक लक्ष असणे महत्त्वाचे आहे.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JAN 2026

लोकमत

# स्थानिक पातळीवर स्टार्टअप संस्कृतीचा विकास महत्त्वाचा : अश्विनी दानीगोंड

## शिवाजी विद्यापीठात दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेस प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जागतिक स्तरावर झेप घेण्यासाठी स्थानिक पातळीवर स्टार्टअप संस्कृतीचा विकास होणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे, असे प्रतिपादन प्रख्यात उद्योजक अश्विनी दानीगोंड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात मंगळवारी दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषदेस प्रारंभ झाला. प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी अमेरिकेतील रोवान विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. कंडलम् रामानुजाचार्य आणि नवी दिल्लीतील डी.आर.डी.ओ.च्या महासंचालक डॉ. चंद्रिका कौशिक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात अश्विनी दानीगोंड यांनी मार्गदर्शन केले.

दानीगोंड म्हणाल्या, शिक्षण, उद्योग आणि शासन हा विद्या, बुद्धी आणि शक्ती यांची त्रिवेणी संगम असून, त्या माध्यमातूनच देशात उद्योग-व्यवसायांचे सक्षमीकरण करणे शक्य आहे. 'विकसित भारत@२०४७'. ही संकल्पना प्रत्यक्षात आणावयाची असल्यास शैक्षणिक क्षेत्रात योगदान अत्युच्च असण्याची आवश्यकता आहे. सर्वच क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी सुसज्ज मनुष्यबळ निर्माण करण्याची जबाबदारी या परिषदांमधून पार पाडली जाते. प्रा. रामानुजाचार्य म्हणाले, शैक्षणिक क्षेत्राला उद्योगांच्या गरजांनुसार संशोधनाच्या दिशा ठरवल्या पाहिजेत. त्यामुळे शिक्षण-उद्योग सहकार्य परिषदा कळीची भूमिका बजावतात.

यावेळी डॉ. चंद्रिका कौशिक यांनीही मनोगत व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी वाहून परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. दानीगोंड यांनी परिषदेच्या ई-स्मरणिकेचे प्रकाशन केले. समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुभाष माने यांनी आभार मानले. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, ज्येष्ठ संशोधक डॉ. प्रकाश वडगांवकर, मलेशियाचे डॉ. मोहम्मद याझीद, ऑस्ट्रेलियाचे डॉ. महेश सूर्यवंशी, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. संजय चव्हाण, डॉ. कल्याणराव गरडकर उपस्थित होते.

21 JAN 2026

तरुण भारत

# स्टार्टअप संस्कृतीचा विकास आवश्यक : अश्विनी दाणीगोंड

प्रतिनिधी

कोल्हापूर

जागतिक स्तरावर झेप घेण्यासाठी स्थानिक पातळीवर स्टार्टअप संस्कृतीचा विकास होणे गरजेचे आहे., असे प्रतिपादन प्रख्यात उद्योजक अश्विनी दाणीगोंड यांनी केले. शिवाजी विद्यापीठात दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय शिक्षण, उद्योग, शासन परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. अमेरिकेतील रोवान विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. कंडलम् रामानुजाचार्य व नवी दिल्ली येथील डी.आर.डी.ओ.च्या महासंचालक डॉ. चंद्रिका कौशिक यांची प्रमुख उपस्थिती होती.

दाणीगोंड म्हणाल्या, उद्योजकता विकासाच्या प्रक्रियेमध्ये नवोन्मेषाला पर्याय नाही. त्यासाठी केवळ मूल्यांकनावर नव्हे, तर मूल्यनिर्मितीवर भर देण्याची आवश्यकता आहे.



कोल्हापूर : येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत बोलताना अश्विनी दाणीगोंड.

शिक्षण, उद्योग व शासन हा विद्या, बुद्धी व शक्तीचा त्रिवेणी संगम असून देशात उद्योग-व्यवसायांचे सक्षमीकरण करणे शक्य आहे. 'विकसित भारत २०४७' साठी शैक्षणिक क्षेत्रात योगदानाची आवश्यकता आहे.

राष्ट्रनिर्मिती प्रक्रियेत शिक्षण, आरोग्य, कृषी आदी सर्वच क्षेत्रांत कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचे उपयोजन करण्यासाठी मनुष्यबळ निर्माणाची जबाबदारी अशा परिषदांमधून पार पाडली गेली पाहिजे. त्यामध्ये सातत्य राहण्याची आवश्यकताही त्यांनी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 JAN 2026
जनप्रवास

# स्टार्टअप संस्कृतीचा विकास होण्याची गरज

## उद्योजक अश्विनी दाणीगोंड : शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय शिक्षण, उद्योग, शासन परिषदेस प्रारंभ


**जनप्रवास : कोल्हापूर**

जागतिक स्तरावर झेप घेण्यासाठी स्थानिक पातळीवर स्टार्टअप संस्कृतीचा विकास होणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे, असे प्रतिपादन उद्योजक अश्विनी दाणीगोंड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषदेस प्रारंभ झाला. परिषदेच्या उद्घाटन समारंभाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या.

दाणीगोंड म्हणाल्या, उद्योजकता विकासाच्या प्रक्रियेमध्ये आजघडीला नवोन्मेषाला पर्याय नाही. त्यासाठी केवळ मूल्यांकनावर नव्हे, तर मूल्यनिर्मितीवर भर देण्याची आवश्यकता आहे. शिक्षण, उद्योग आणि शासन हा विद्या, बुद्धी आणि शक्ती यांचा त्रिवेणी संगम असून त्या माध्यमातूनच देशात उद्योग-व्यवसायांचे सक्षमीकरण करणे शक्य आहे. 'विकसित भारत@२०४७' ही संकल्पना आपल्याला प्रत्यक्षात आणावयाची असल्यास त्या प्रक्रियेमध्ये शैक्षणिक क्षेत्रात योगदान अत्युच्च असण्याची आवश्यकता आहे. उच्च गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन गुणवत्तासंपन्न विद्यार्थी देशाला सोपविण्याची जबाबदारी उच्चशिक्षण संस्थांवर आहे. स्थानिक गुणवत्ता जास्तीत जास्त पारखून आणि निवडून देशाच्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये सामील केले पाहिजे. आजच्या मंथनातून जे सृजन घडेल, त्यातून उद्याच्या भारताचे भवितव्य साकार होईल. प्रा. रामानुजाचार्य म्हणाले, शैक्षणिक क्षेत्राला उद्योगांच्या गरजांनुसार आपल्या संशोधनाच्या दिशा ठरवाव्या लागतात. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील नवनव्या प्रवाहांवर शैक्षणिक क्षेत्राचे बारीक लक्ष असणे महत्त्वाचे आहे.

डॉ. चंद्रिका कौशिक यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. सागर डेळेकर यांनी प्रास्ताविक केले. सहसमन्वयक डॉ. सुभाष माने यांनी आभार मानले. यावेळी अमेरिकेतील रोवान विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. कंडलम् रामानुजाचार्य आणि नवी दिल्ली येथील डीआरडीओच्या महासंचालक डॉ. चंद्रिका कौशिक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, डॉ. प्रकाश वडगांवकर, मलेशियाचे डॉ. मोहम्मद याझीद, ऑस्ट्रेलियाचे डॉ. महेश सूर्यवंशी, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. संजय चव्हाण, डॉ. कल्याणराव गरडकर आदी उपस्थित होते.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना अश्विनी दाणीगोंड. सोबत डॉ. सागर डेळेकर, प्रा. कंडलम् रामानुजाचार्य, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. चंद्रिका कौशिक, डॉ. सुभाष माने.

21 JAN 2026

पुण्यनगरी

# झोनल नेटबॉल स्पर्धेचे उद्घाटन

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व येथील शिवराज महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवाजी विद्यापीठ झोनल पुरुष व महिला नेटबॉल स्पर्धेचे उद्घाटन येथील शिवराज महाविद्यालयाच्या मैदानावर संचालक प्रा. विश्वजित कुराडे यांच्या हस्ते करण्यांत आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. कदम होते.

यावेळी उद्घाटनाचा सामना शिवराज महाविद्यालय विरुद्ध घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर यांच्यात झाला. शिवराज महाविद्यालयाने ३-० ने घोडावत महाविद्यालयाचा पराभव केला. यावेळी तानाजी चौगुले, प्राचार्य ए. बी. पाटील, डॉ. धनंजय पाटील, प्रा. सुनील पाटील, डॉ. विकास जाधव, डॉ. विक्रम नांगरे-पाटील, प्रा. रोहन आडनाईक, प्रा. गावडे, प्रा. गुंजीकर उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी डॉ. राहुल मगदूम, प्रा. जयवंत पाटील, किरण कावणेकर आदींसह प्रशासकीय कर्मचारी परिश्रम घेत आहेत. उद्घाटनप्रसंगी मान्यवर, शिक्षक, खेळाडू उपस्थित होते.

21 JAN 2026

लोकमत

# एमबीए प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र अंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग आणि तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त ऑनलाइन एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी २०२५-२६ मधील जानेवारी २०२६ करिता प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. २८ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाइन प्रवेश अर्ज सादर करावेत,' असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JAN 2026

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimiti Corner Appartment, Kolhapur
Mob.: 9175089609

# शिवाजी विद्यापीठातील ऑनलाइन एम.बी.ए. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू

## प्रवेश अर्ज २८ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाइन पद्धतीने सादर करण्याचे आवाहन

**कोल्हापूर, ( महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र (CDOE) अंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) मान्यताप्राप्त ऑनलाइन एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२५२६ मधील जानेवारी २०२६ सत्राकरिता प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी दि. २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ऑनलाइन पद्धतीने प्रवेश अर्ज सादर करावेत, असे आवाहन केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार हा ऑनलाइन एम.बी.ए. अभ्यासक्रम मागील काही वर्षांपासून यशस्वीपणे राबविण्यात येत असून, प्रवेश, अध्ययन, परीक्षा व निकाल या सर्व शैक्षणिक प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन स्वरुपात पार पडणार आहेत. या अभ्यासक्रमातून मिळणारी एम.बी.ए. पदवी ही इतर कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या एम.बी.ए. पदवीच्या समकक्ष आहे.

UGC च्या ''एक दर्जा'' (Category-I) मानांकन असलेल्या शिवाजी विद्यापीठाने ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करून बदलत्या जागतिक शैक्षणिक व औद्योगिक गरजांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. घरबसल्या मोबाईल किंवा संगणकाच्या माध्यमातून जागतिक दर्जाचा ऑनलाइन एम.बी.ए. अभ्यासक्रम पूर्ण करण्याची सुवर्णसंधी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र उपलब्ध करून देत आहे.

सुसज्ज Learning Management System (LMS) च्या माध्यमातून विषयतज्ज्ञांनी विकसित केलेली व्हिडीओ व्याख्याने, ई-बुक्स, लाईव्ह काउन्सेलिंग सत्रे, डिस्कशन फोरम, प्रॅक्टिस टेस्ट्स यांसारख्या सुविधांद्वारे विद्यार्थ्यांना अध्ययन करता येणार आहे. तसेच विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेल मार्फत रोजगाराच्या संधीही उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

इच्छुक उमेदवारांनी प्रवेश अर्ज शिवाजी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://www.unishivaji.ac.in/admissions/ या लिंकवर जाऊन ऑनलाइन पद्धतीने भरावा, असे आवाहन संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले आहे.

21 JAN 2026

पुढारी

ESTD: 1962
NAAC "A ++" Grade
CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## Advertisement

Applications are invited from eligible candidates for the following position to work in the Shivaji University Spoke projects of IISc. PAIR Network on Advanced Materials sanctioned under ANRF PAIR Program. The application in the prescribed format should reach on or before 31 January 2026 till 6:00 PM.

| Sr. No. | Name of the position | Number of posts | Fellowship per month (consolidated) |
|---|---|---|---|
| 1 | Project Assistant (PA) | 02 (Two) | Rs. 27,000/- plus 20 % HRA |
| 2 | Research Associate-I (RA-I) | 02 (Two) | Rs. 58,000/- plus 20 % HRA |

The details are available in the Shivaji University website (**https://www.unishivaji.ac.in/recruitments/Under-Research-Projects**)

**Kolhapur**
**Date: 21/01/2026**

**Dr. Vilas N. Shinde**
**Registrar**

21 JAN 2026

लोकमत

# विकासाची धोरणे राबविण्यासाठी सत्ताधाऱ्यांवर दबाव आवश्यक

## वसंत भोसले : 'मनपा निकालांचा अन्वयार्थ' वर विद्यापीठात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राज्यातील विविध महापालिकांमध्ये विकासाची धोरणे राबविण्यासाठी लोकांनी सत्ताधाऱ्यांवर दबाव आणणे आवश्यक आहे, तरच विकासाची प्रक्रिया गतिमान होईल, असे मत ज्येष्ठ पत्रकार डॉ. वसंत भोसले यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित 'मनपा निकालांचा अन्वयार्थ' या विषयावर ते बोलत होते. ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. डॉ. प्रकाश पवार अध्यक्षस्थानी होते.

डॉ. भोसले म्हणाले, गेल्या काही वर्षांत शहरीकरण वाढले आहे. वाढत्या शहरांचे नियोजन करण्यात राजकीय व्यवस्था कमी पडली आहे. पुढच्या पंचवीस वर्षांचा विचार करून शहरांचे नियोजन करणे आवश्यक आहे. तथापि, आपल्याकडे शहरात समस्या निर्माण झाल्यानंतर त्या सोडविण्यावर भर दिला जातो. वास्तविक पाहता, समस्या निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे.

प्रा. पवार म्हणाले, शहरातील गरिबांसाठी काम करणारा राजकीय पक्ष उरला नाही. निवडणुकीत पैशांचा आणि अन्य भेटवस्तू तसेच आमिषांचा वापर चिंताजनक आहे. क्षणिक मोहाला बळी पडून मतदार मतदान करू लागले तर लोकशाही व्यवस्था धोक्यात येईल. मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. सुमेधा साळुंखे, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



ज्ञान-विज्ञान

# संरक्षणासाठी अग्नीचा वापर!

डॉ. व्ही.एन. शिंदे

**आगीच्या मध्यस्थानी माती आणि खडक, दगड, धोंडे पडत नाहीत; तर गवत, वेली आणि वृक्षच जळतात. म्हणजे आग कोणत्या पदार्थांमुळे टिकून राहते हेसुद्धा मानवाच्या लक्षात आले. यातून आपण आगीवर नियंत्रण मिळवू शकतो हे त्याला उमगले.**

संशोधकांच्या मते मानव पृथ्वीवरील सर्वात दुबळा जीव म्हणून निर्माण झाला. तो अन्य प्राण्यांपासून स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी सर्वाधिक लक्ष देत असे. मानवाच्या शरीराची रचना शाकाहारासाठी अनुकूल अशी होती आणि आहे. दातांची रचना आणि आतड्याची रचनाही शाकाहारी प्राण्यांप्रमाणे आहे. अगदी सुरुवातीपासून माणसाला स्वसंरक्षणाची भिती होती. त्यामध्येही मानव समूहाने राहणारा प्राणी, समाजप्रिय. मात्र, त्यामध्येही अन्य प्राण्यांप्रमाणे वर्चस्ववाद होताच. १०० ते १५० लोकांचे समूह एकत्र रहात. खूपच मोठा समूह झाला की तो फुटत असे. एकाच्या दोन टोळ्या होत. मात्र, त्यातून सुरक्षेचे नवे प्रश्न निर्माण होत.

त्यामुळे अगदी सुरुवातीपासून माणसासाठी चिंतनाचा विषय राहिला तो स्वसंरक्षण. या विषयाचा विचार अन्य प्राणीही करत. आजही ते करतात. एवढेच कशाला; धोक्याचा, संकटाचा इशारा देणाऱ्या यंत्रणा वनस्पतींमध्येही विकसित झालेल्या असतात असा निष्कर्ष पीटर वोहलेबेन या जर्मन वनपाल आणि संशोधकाने त्यांच्या 'दि हिडन लाईफ ऑफ ट्रीज' या पुस्तकामध्ये केला आहे. माकडेही वाघ, सिंह आल्याचा, घार आल्याचा इशारा अन्य साथीदारांना विशिष्ट पण वेगवेगळे आवाज काढून देतात. मधमाशांचे संवादशास्त्र हा एक मोठा अभ्यासाचा विषय राहिला आहे. या सर्व जीवांमधील सर्वात कमजोर कडी म्हणून निर्माण झालेल्या मानवाला अन्नाची चिंता नव्हती. त्यावेळी शाकाहार हाच आहार असल्याने अन्न मुबलक प्रमाणात उपलब्ध होते. संरक्षणासाठी त्याने गुहांचा, झाडांचा आसरा घ्यायला सुरुवात केली, तरी तो खऱ्या अर्थाने सुरक्षित झाला नाही. संशोधकांच्या मते, मानवाने मांसाहारास सुरुवात केली असावी, ती एखाद्या दुष्काळामध्ये. पुरातत्त्व संशोधनातून मानवाच्या रचनेबद्दल पुरावे मिळत असले तरी त्याच्या आहाराच्या सवयींबद्दल पुरावे उपलब्ध होत नाहीत; त्यामुळे तर्कांच्याआधारे याबद्दलचे निष्कर्ष काढण्यात आले आहेत. मानवाने स्वसंरक्षणासाठी प्रथम अन्य प्राण्यांच्या वर्तनाचे निरीक्षण सुरू केले. मानवालाही सुरुवातीला नैसर्गिक आपत्तींना अन्य प्राण्यांप्रमाणेच सामोरे जावे लागत होते. आज विज्ञान आणि तंत्रज्ञानात एवढी प्रगती झाली असली तरी जंगलातील आगीमध्ये आजही अनेक मनुष्यप्राण्यांचे जीव जातात. त्या काळात तर मानवाचा वावरही अन्य प्राण्यांप्रमाणेच असल्याने अन्य प्राण्यांप्रमाणे मानवी जीवांची हानीही अनेकदा झाली असावी. मात्र, अशा घटनांचे कोणतेही पुरावे आज उपलब्ध नाहीत.

माणसाचे सुरुवातीचे ज्ञान म्हणजे निसर्गात घडणाऱ्या घटना कशा घडतात हे जाणून घेऊन त्यांचा आपल्या फायद्यासाठी उपयोग करून घेणे, एवढ्यापुरते मर्यादित होते. अशाच वणव्यावेळी मानवाला सर्वात प्रथम स्वसंरक्षणासाठी आगीचा वापर होऊ शकतो हे लक्षात आले. आग दिसली की वाघ, सिंहांसारख्या प्राण्यांचीही मांजर होते आणि ते आगीपासून दूर पळून जातात, हे त्याने वारंवार पाहिले. तसेच पाण्याला आग लागत नाही आणि पाणी ओतून आग विझवता येते, हे ही माणसाच्या लक्षात आले. तसेच आगीच्या मध्यस्थानी माती आणि खडक, दगड, धोंडे पडत नाहीत, तर गवत, वेली आणि वृक्षच जळतात; म्हणजे, आग कोणत्या पदार्थांमुळे टिकून राहते हेसुद्धा मानवाच्या लक्षात आले. यातून आपण आगीवर नियंत्रण मिळवू शकतो हे त्याला उमगले. आग काही विशिष्ट झाडांच्या लाकडाला घासून तयार करता येते, हे त्याला निसर्गघटनांचे निरीक्षण करतानाच लक्षात आले. म्हणजे आग कशी निर्माण करायची, टिकवून ठेवायची आणि विझवायची, हे माणसाच्या लक्षात आले. मात्र, आगीला संरक्षणासाठी वापरायचे तर एका ठिकाणी राहणे गरजेचे बनले.

मानवाने त्यासाठी एखाद्या ठिकाणी वस्ती करून राहण्यासाठी प्रयत्न सुरू केले. अशी वस्ती करायची तर पिण्यासाठी आणि आग विझवण्यासाठी पाणी ही आवश्यक गरज होती. एरवी फिरताना मिळेल तेथील पाणी प्यायची सवय होती. आता गरज लागेल तेव्हा पाणी सहज उपलब्ध होणे गरजेचे होते, म्हणून माणसाने भरपूर पाणी असलेल्या नदीच्या किनाऱ्यांना वस्तीसाठी पसंत केले. माणसाने तेथे निसर्गात आढळणाऱ्या गवत आणि झाडांच्या फांद्यांचा वापर करून आडोसे तयार करून निवारा तयार केला. त्यासाठी जाड आणि पसरट पानांच्या सहाय्याने छत तयार करायला सुरुवात केली. रात्री वाघ, सिंह, लांडगे आणि तरस इत्यादी प्राण्यांपासून संरक्षण मिळवण्यासाठी, वस्तीच्या ठिकाणी अग्नीकुंड पेटते ठेवले जाऊ लागले. प्राण्यांच्या हल्ल्यापासून मानवी वस्त्या सुरक्षित झाल्या.

संरक्षणासाठी मानवाने अग्नीचा वापर करता येतो हे जसे समजून घेतले, तसेच वणव्यांमध्ये भाजले गेलेले प्राणी खाताना अग्नीमध्ये भाजून खाल्लेले अन्न वेगळाच आनंद देते, हेही मानवाच्या लक्षात आले होते. त्यामुळे अग्नी केवळ आपल्या संरक्षणासाठीच नाही तर जिभेचे चोचले पुरवण्यासाठीही उपयोगाचा आहे, याचे ज्ञान मानवाला झाले. ज्या धान्यांचा, कंदमुळांचा खाण्यासाठी वापर करायचा, तीही वणव्यांमध्ये अर्धवट भाजलेल्या अवस्थेत खावे लागले ते मजबुरीमुळे. त्याला ती चव आवडली. त्यातून अन्नपदार्थ भाजून किंवा शिजवून खाण्यासाठी तो वापरू लागला. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये केवळ माहिती मिळाल्यानंतर तो आगीचा वापर करू लागला. पुढच्या काळात अग्नी प्रज्वलित ठेवण्यासाठी कोणकोणते पदार्थ इंधन म्हणून वापरता येऊ शकतात, वाळलेली लाकडे सहज जळतात, मात्र ओली लाकडे सहज जळत नाहीत, जळली तरी धूर खूप करतात. धुरामुळे डोळ्यांना त्रास होतो, अशा आज आपणास सहज माहीत असलेल्या गोष्टी हळूहळू निरीक्षणांतून मानवाच्या लक्षात आल्या. त्यानुसार तो नियोजन करू लागला. वाळलेल्या लाकडाचा साठा करून ठेवणे, ते भिजणार नाही याची दक्षता घेणे, नको असेल त्या ठिकाणचा अग्नी विझवणे, हे सर्व तो अनुभवातून शिकत गेला.

अनुभवांचे सर्वसमावेशक विश्लेषण करून संपूर्ण ज्ञाननिर्मितीची प्रक्रिया एकाचवेळी घडली नाही. त्या-त्या टप्प्यावर मानवाला जे उमगले ते त्याने इतरांना सांगितले. आपल्या टोळीतील लोकांना त्यांनी ते सांगितले. टोळीतील सर्वांपर्यंत ते ज्ञान पोहोचून पुढच्या पिढीकडे पण हस्तांतरीत होत गेले. मात्र, या सर्व माहितीचे लिखित दस्ताऐवज तयार झाले नाहीत, कारण अगदी सुरुवातीच्या काळात, म्हणजे मानवाने अग्नीचा वापर आपल्या संरक्षणासाठी आणि सुखासाठी करायला सुरुवात केली त्या कालखंडात भाषा, लेखन आणि त्यासाठी लिपीच अस्तित्वात आलेल्या नव्हत्या. हा काळ साधारणतः २० लाख वर्षापूर्वीचा होता; तर लेखन प्रक्रियेमध्ये सर्वात जुना ग्रंथ ऋग्वेद मानला जातो. तो लिहिला गेला आहे साधारण साडेतीन चार हजार वर्षांपूर्वी, त्यामुळे जगभरातील सर्व मानवाच्या पूर्वजांमध्ये ज्ञानदान हे प्रामुख्याने मौखिक पद्धतीने होत होते. पूर्वीच्या लोकांनी दिलेल्या ज्ञानामुळे पुढचे चिंतन सोपे होत असे, त्यातूनच हळूहळू विज्ञान विकसित झाले.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर

21 JAN 2026

महा न्यूज & न्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.: 9175089609

# लोकशाहीच्या व्यापक विस्तारात जी. डी. बापूंचे स्मरण आवश्यक : खोरे

कोल्हापूर, ( महा न्यूज अँण्ड न्यूज) :

सातारची प्रतिसरकार चळवळ ही आदर्श राजनीतीचे प्रतीक होते. या संपूर्ण चळवळीची प्रेरणा ही स्वातंत्र्याची आणि सामाजिक समतेची होती. साम्राज्यवादास पर्यायी व्यवस्था म्हणून ही चळवळ उभी राहिली. फिल्डमार्शल जी. डी. बापू लाड यातील एक प्रमुख होते. पर्यायी समाजाचे चित्र जी. डी. बापूंच्या जीवनदृष्टीत होते. या चळवळीला वैचारिक भूमी होती. न्यायदान व सावकारमुक्ती हे दोन महत्त्वाचे घटक होते. संघटनात्मक कार्याचे प्रारूप म्हणून याकडे नव्या अभ्यासकांनी पाहावला हवे. किंबहुना प्रतिसरकार चळवळीचे दस्तऐवजीकरण होणे गरजेचे आहे. आजच्या लोकशाहीच्या व्यापक विस्तारात जी. डी. बापूंचे स्मरण ठेवणे आवश्यक आहे. असे मत ज्येष्ठ संपादक अरुण खोरे यांनी व्यक्त केले. ते शिवाजी विद्यापीठातील 'क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड अध्यासन' आयोजित 'प्रतिसरकारची चळवळ आणि जी. डी. बापू लाड' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.



खोरे म्हणाले, भूमिगत चळवळ ही सामान्य माणसांचा आवाज होती. लोकशाहीचा विचार केंद्रस्थानी ठेवून ती राबवली जात होती. आता मात्र आजच्या स्थितिगतीने या कार्याचा विचार व्हायला हवा. त्यासाठी सामाजिक दुवे मांडणे गरजेचे आहे. या चळवळीमागे तत्कालीन महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास आणि संसदीय लोकशाहीचा संदर्भ आहे. कुलसचिव शिंदे म्हणाले, सामन्यातला सामान्य दोन घास सुखाने खावा या हेतुने प्रतिसरकारची चळवळ उभी राहिली. स्वराज्यातून सुराज्य हे या चळवळीचे स्वप्न होते. बापूंनी मराठवाडा मुक्ती संग्रामात महत्त्वाचे योगदान दिले. प्रतिसरकार चळवळीतील अनेक दुवे अजूनही दुर्लक्षित आहेत. त्यांचा अभ्यास होणे गरजेचा आहे.

मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. विष्णू पावले यांनी आभार मानले. सूत्रसंचालन भक्ती नाईक यांनी केले. यावेळी प्रा. नंदकुमार मोरे, प्राचार्य आर. एस. डुबल, डॉ. नवनाथ गुंड, प्रा. भारती पाटील, प्रा. अवनीश पाटील, तसेच एम.ए.चे व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JAN 2026

पुण्यनगरी

# श्रमसंस्कारातून सामाजिक बांधिलकीची जाणीव

## डॉ. टी. एम. चौगले; पाडळी बुद्रुक येथे विवेकानंद कॉलेजचे विशेष शिबिर



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

श्रमसंस्काराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, जबाबदारीची जाणीव आणि सेवाभाव निर्माण होतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयाच्या शिबिर उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. हे शिबिर पाडळी बुद्रुक (ता. करवीर) येथे सुरू झाले असून, दि. २३ पर्यंत चालणार आहे.

या शिबिरात ग्रामस्वच्छता, आरोग्य शिबीर, वृक्षसंवर्धन, एड्स जनजागृती, जलसाक्षरता, महिला सबलीकरण, पर्यावरण जागृती, सांडपाणी व्यवस्थापन तसेच प्रदूषण व पर्यावरणाबाबत जनजागृती असे विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

पाडळीचे सरपंच शिवाजी गायकवाड, प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, उपसरपंच धनाजी पाटील, संदीप पाटील, अरुणा पाटील व राजू पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप पाटील यांनी केले. हेमंत पाटील यांनी आभार मानले.

सूत्रसंचालन डॉ. राजश्री पाटील यांनी केले. डॉ. पी. आर. बागडे, डॉ. बी. टी. दांगट, एम. के. पोवार, एल. आर. कुटिन्हो आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

21 JAN 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# २५ जानेवारी रोजी १६ वा राष्ट्रीय मतदार दिन

## शिवाजी विद्यापीठ येथे साजरा होणार : 'माय इंडिया, माय वोट' ही थीम

**जनप्रवास : कोल्हापूर**

यंदाच्या २५ जानेवारी रोजी १६ वा राष्ट्रीय मतदार दिन जिल्हास्तर, तालुकास्तर व मतदान केंद्र स्तरावर साजरा करण्यात येणार आहे. यावर्षीच्या राष्ट्रीय मतदार दिनासाठी भारत निवडणूक आयोगाकडून 'माय इंडिया, माय वोट' हा विषय (थीम) देण्यात आला आहे.

या अनुषंगाने, दि. २३ जानेवारी रोजी सकाळी १०.३० ते ११ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात मतदार शपथ घेण्यात येणार आहे. तसेच दि. २५ जानेवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी १२.४५ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जिल्हास्तरीय १६ वा राष्ट्रीय मतदार दिन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या उपस्थितीत सिनेट हॉल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे साजरा करण्यात येणार आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी गीता गायकवाड यांनी दिली.

भारत निवडणूक आयोगाने राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यासाठी सर्वसमावेशक प्रचार-प्रसाराचा आराखडा, जिल्हास्तरीय आयकॉन व्यक्तींचा समावेश, विविध संस्थांची भागीदारी व सहयोग, तसेच समाजमाध्यमांद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबाबत सविस्तर सूचना दिल्या आहेत. याशिवाय, मतदार केंद्रस्तर व जिल्हास्तरावर कार्यक्रम राबविताना पाळावयाच्या सूचनाही आयोगाकडून देण्यात आल्या असून त्यांचे तंतोतंत पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सध्या इतर राज्यांमध्ये मतदार यादींच्या सखोल पुनरिक्षणाचा कार्यक्रम सुरु असून, महाराष्ट्रातही नजिकच्या कालावधीत भारत निवडणूक आयोगामार्फत हा कार्यक्रम राबविण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने, पूर्वतयारीचा भाग म्हणून सध्याच्या मतदारांचे २००२ मध्ये झालेल्या विशेष सखोल पुनरिक्षणाअंती तयार करण्यात आलेल्या मतदार यादीतील मतदारांशी मॅपिंग करण्यात येत आहे. तसेच सध्याच्या मतदार यादीतील अस्पष्ट छायाचित्रे, दुबार नोंदी व अतार्किक चुका याबाबत पडताळणी सुरू आहे.

### कॉल अ बीएलओ....

या सर्व बाबींविषयी एनव्हीडी -२०२६ च्या कार्यक्रमात जनजागृती करण्यात यावी. तसेच भारत निवडणूक आयोगाच्या 'कॉल अ बीएलओ' (मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याशी संपर्क) या अभियानाबाबतही मतदारांना माहिती देण्यात यावी, अशी माहिती अवर सचिव तथा उपमुख्य निवडणूक अधिकारी यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष

21 JAN 2026 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्वसमावेशक भारताची संकल्पना गांधी, नेहरूंमुळे

## खोरे : शिवाजी विद्यापीठात गांधी, नेहरू अभ्यास केंद्रातर्फे व्याख्यान

कोल्हापूर, ता. २० : 'देशांच्या उत्थानासाठी कार्य करण्याचे मार्ग वेगळे असले तरी गांधी, नेहरू आणि आंबेडकर यांचे भारताच्या व्यापक उभारणीचे उद्दिष्ट मात्र एकच होते. ते साध्य करण्यासाठी त्यांनी संघर्षातून समन्वयात्मक संवादाचा मार्ग स्वीकारला. त्यातून सर्वसमावेशक भारताची संकल्पना साकारली,' असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्र आणि नेहरू अभ्यास केंद्राने 'महात्मा गांधी-डॉ. बाबासाहेब आंबेडकर-पंडित जवाहरलाल नेहरू : एक संवाद' या विषयावर घेतलेल्या विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे होते.



शिवाजी विद्यापीठ : विशेष व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे. शेजारी डॉ. प्रकाश पवार, रणधीर शिंदे.

खोरे म्हणाले, 'गांधी आणि नेहरू, आंबेडकर यांच्यामध्ये एका पिढीचे अंतर होते. त्यामुळे त्यांच्यामध्ये काही बाबतीत मतभेद होत असत. तरीही गांधी, नेहरूंमध्ये एक वेगळे अद्वैत होते. नेहरूंसाठी गांधी नेहमीच पित्यासमान राहिले. गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना आणि नेहरूंचा आधुनिकतावादी दृष्टिकोन यामध्ये अंतर असले तरी गांधींच्या रचनात्मक कार्याला नेहरूंचे सदैव सहकार्य राहिले. गांधी-नेहरू-आंबेडकर यांनी आखिल भारतीय समाजाच्या सर्वांगीण प्रगतीचे स्वप्न पाहिले. या त्रयीने देशाच्या निर्मितीच्या कालखंडात घेतलेल्या भूमिकांचा समग्र आणि साकल्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या विचारकार्याचे विस्मरण देशाला परवडणारे नाही.'

डॉ. शिंदे म्हणाले, 'तत्कालीन परिस्थितीमध्ये गांधी, नेहरू आणि आंबेडकर यांच्यासमोरील अग्रक्रमाचे मुद्दे वेगवेगळे होते, पण राष्ट्रनिर्मितीचे ध्येय मात्र समान होते. आज या महामानवांच्या विचारांना संकुचित आणि बंदिस्त करण्याचे प्रयत्न विविध स्तरांवर सुरू आहेत. ते उल्लंघून त्यांच्याकडे पुन्हा नव्याने पाहणे आवश्यक आहे.'

यावेळी शोभा खोरे, डॉ. सुनीलकुमार लवटे, व्यंकाप्पा भोसले, दशरथ पारेकर, जयसिंग पाटील, डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते. डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. मतीन शेख यांनी सूत्रसंचालन केले. सोनाली जाधव यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2026
लोकमत

# कौशल्यवृद्धीसाठी वृत्तलेखन कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सकारात्मक अभिव्यक्तीमधून माणूसपण घडत जाते आणि मानवतेच्या कक्षा रुंदावतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रातील अंतर्गत शिक्षकांमध्ये गुणवत्ता व कौशल्यवृद्धीसाठी बातमीलेखन याविषयी डॉ. जत्राटकर यांचे शुक्रवारी विशेष व्याख्यान झाले. केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील अध्यक्षस्थानी होते.

डॉ. नितीन रणदिवे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सचिन भोसले यांनी परिचय करून दिला. संदीप थिटे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नगिना माळी यांनी आभार मानले.